# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)

## अणुविद्युत व दुरसंदेश अभियांत्रिकी विभाग

---

## अणुविद्युत व दुरसंदेश अभियांत्रिकी विभागासाठीच्या निविदेचे

## ई-निविदा पूर्व बैठकीचे इतीवृत्त (Minutes of Meeting)

**संदर्भ :** शाअवसंमाअ/E&TC/Electronic & comm. Equ /खरेदी/२०२४/४४७२ , दि. ३०/१२/२०२४

**संस्थेच्या अणुविद्युत व दुरसंदेश अभियांत्रिकी विभागासाठी वरील संदर्भीय प्रसिध्द केलेल्या यंत्रसामुग्री, उपकरणे खरेदीच्या निविदेंच्या अनुषंगाने ई-निविदा पूर्व बैठक (Pre-bid meeting) आज दि. ०६/०१/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा संस्थेच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात पार पडली. सदर सभेस खालील अधिकारी तसेच निविदाकार उपस्थित होते.**

समिती सदस्य

१) डॉ. एम.एस.नागमोडे - प्राध्यापक व विभाग प्रमुख **अणुवीद्यत व दुरसंदेश** अभि. विभाग

२) डॉ. एन.पी.फुटाणे - सह. प्राध्यापक, **अणुविद्युत व दुरसंदेश** अभि. विभाग

३) श्री जी.आर.फुले - सहा. प्राध्यापक **अणुविद्युत व दुरसंदेश** अभि. विभाग

४) श्री. एस. एन. अडागळे - प्र. प्रबंधक, शा. अ. व. सं. महा. अवसरी (खुर्द)

निविदाकार/निविदाकारांचे प्रतिनिधी

१) श्री विजय वढणे - Scientech Technologies Pvt.Ltd., Pune

२) श्री अमोल जंगम - Anshuman Tech.Pvt. Ltd.,Pune

सर्व प्रथम समिती अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि सभेच्या प्रयोजनाचा उद्देश सांगून सभेस सुरुवात झाली. दिनांक ९ सप्टेबर २०२४ च्या शासन ज्ञापन क्र. तंशिख/(प्र.क्र.२१५/२०२४)/तांशि-३ यातील खालील खरेदीविषयक बाबी उपस्थित निविदाकाराना / सर्व निविदाकाराना अवगत करून देण्यात आल्या.



Scanned with CamScanner

१) **अटी मुद्दा क्र. ४** - खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता दिलेल्या ज्या यंत्रसामुग्री, उपकरणे इत्यादींची प्रति नग अंदाजित किंमत रु. ३.०० लक्ष पेक्षा कमी आहे अशा यंत्रसामुग्री, उपकरणे इत्यादींची Warranty किमान २ वर्ष विहित करण्यात यावी, ज्या यंत्रसामुग्री, उपकरणे इत्यादींची प्रति नग अंदाजित किंमत रु. ३.०० लक्ष पेक्षा जास्त व रु. ७.०० लक्ष पेक्षा कमी आहे अशा यंत्रसामुग्री, उपकरणे इत्यादींची Warranty किमान ३ वर्ष विहित करण्यात यावी आणि ज्या यंत्रसामुग्री, उपकरणे इत्यादींची प्रति नग अंदाजित किंमत रु. ७.०० लक्ष पेक्षा जास्त आहे अशा यंत्रसामुग्री, उपकरणे इत्यादींची Warranty किमान ५ वर्ष विहित करण्यात यावी.

२) **अटी मुद्दा क्र. ५** - निविदेमध्ये Warranty पश्चात किमान २ वर्ष सेवा देण्याचे बंधनकारक असल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. हि Warranty पश्चात सेवा सशुल्क असेल. सदर बाबी निविदेमध्ये अंतर्भूत करणे अनावधाने राहून गेल्याने आजच्या ई-निविदा पूर्व बैठक (Pre-bid meeting) मध्ये त्याविषयी सर्व निविदाकाराना अवगत करण्यात येते कि निविदा सादर करताना वरील दोन्ही महत्वाच्या बाबींचा विचार करून निविदा सादर कराव्यात.

३) या बाबिंव्यतिरिक्त, ज्या निविदाकाराची निविदा L1 (नुनतम) म्हणून घोषित करण्यात येईल त्यावेळी सदर यंत्रसामुग्री, उपकरणे, साहित्य हे संस्थेमध्ये विनाशुल्क सुस्थितीत पोहच करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची असेल तसेच पुरविलेल्या सर्व यंत्रसामुग्री, उपकरणांची माहिती (Demonstration and Hard Copy of Manual) पुरावाठदाराच्या तज्ञ व्यक्तीने (Technical Expert) विभागातील अधिकाऱ्यांना समाधानकारक दिल्यानंतरच देयकाची पुढील प्रक्रिया करण्यात येईल.

४) निविदाकारानी **प्रपत्र ब** नुसार सर्व संबंधित कागदपत्रे सादर करणे (Online upload करणे) आवश्यक आहेत. तसेच सदर प्रपत्रातील अ.क्र. १० नुसार निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे स्वसाक्षांकित हमीपत्र रु. ५००/- च्या stamp paper वर सादर करणे आवश्यक असेल.



Scanned with CamScanner

५) वाणिज्यिक निविदेसोबत जोडलेल्या **प्रपत्र-क** (BoQ नमुना) नुसार वाणिज्यिक निविदेतील सर्व साहित्यांचे दर निविदाकाराने प्रत्यक उपकरणासाठी सर्व करासहित (Per Unit Cost with Tax) देणे अवश्यक आहे अन्यथा अपूर्ण निविदा बाद ठरविण्यात येईल.

सभेमध्ये उपस्थित निविदाकारांनी उपस्थित केलेल्या शंकांचे समितीने खालीलप्रमाणे निरसन केले.

१) Anshuman Tech.Pvt. Ltd.,Pune यांच्या प्रतिनिधींनी Power Electronics Trainer kit मध्ये, Output waveform पाहण्याकरीता Power scope असावा असे सूचित केले, त्यावर सर्वानुमते असे ठरवण्यात आले की . **All Power Electronics trainer kits should have provision or accessory for observing all types of output waveforms including Power waveforms .**

२) Anshuman Tech.Pvt. Ltd.,Pune यांच्या प्रतिनिधींनी Communication Trainer Kit मध्ये Technical Specifications मध्ये Number of Test points बद्दल मुद्दा उपस्थीत केला. त्यावर सर्वानुमते असे ठरवण्यात आले की, **For Communication Trainer Kits test points should be in adequate numbers as per the requirements to test output at different Point.**

यांनतर उपस्थितांचे आभार मानून सभा समाप्त झाल्याचे घोषित करण्यात आले.

6/1/25 (श्री जी.आर फुले.). Asst Prof EXTC

6/1/25 (डॉ.एन.पी फुटाणे). Ass. EXTC

06/01/25 (डॉ. एम.एस.नागमोडे) HOD & Prof EXTC

06-1-25.
**(डॉ. डी. आर. पानगव्हाणे)**
**प्राचार्य**
**शासकीय अभि. व संशोधन महा., अवसरी (खुर्द)**

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे



Scanned with CamScanner